ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

दूरध्वनी क्रमांक - (0253) 2231714, 2231715, 2230227, 2230013 टेलिफॅक्स (0253) 2230298

जा. क्र. : एचएक्स/परीक्षा कक्ष-३/2018/ 302 दिनांक-13 डिसेंबर, 2018,

प्रति,
मा.केंद्रप्रमुख व केंद्रसंयोजक
य.च.म.मु.वि.अभ्यासकेंद्र
---
---

**अत्यंत महत्वाचे**

**विषय –जानेवारी 2019 च्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबतच्या महत्वाच्या सूचना**

मा. महोदय,

निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत राबिविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमांच्या परीक्षा जानेवारी 2019 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या आहेत. हॉटेल मॅनेजमेंट, बी.एस्सी. अँनिमेशन, बेसिक फॅसिलिटी सर्व्हिसेस व अभियांत्रिकी शिक्षणक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा अभ्यासकेंद्रांवर आयोजित करण्यात येतात. सदर परीक्षेसाठी महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे –

1) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी 30 विद्यार्थ्यांची 1 बॅच करावी. (एका दिवसात 2 बॅच याप्रमाणे परीक्षेचे आयोजन करावे.) हॉटेल मॅनेजमेंट शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांनी परीक्षेचे वेळापत्रक तयार करून त्याची एक प्रत त्वरीत उपकुलसचिव, परीक्षा कक्ष-३ यांचेकडे पाठवावी.
2) प्रात्यक्षिक परीक्षेच्या अभ्यासक्रमनिहाय कोऱ्या उपस्थिती याद्या व गुणदान याद्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर आपल्या केंद्राच्या **login** मध्ये उपलब्ध आहेत. अभ्यासकेंद्रांनी सदर याद्या **User Id & Password** वापरून वेबसाईटवरून डाऊनलोड करून घ्याव्यात.
3) प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी उपस्थीती यादीवर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.
4) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी वरिष्ठ बहि:स्थ परीक्षकाची नियुक्ती विभागीय केंद्राकडून करण्यात येईल.
5) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या वरीष्ठ बहि:स्थ परीक्षकाचे मानधन व प्रवास व दैनिक भत्ता विभागीय केंद्रामार्फत देण्यात येईल.
6) **Theory CA च्या गुणदान याद्या लेखी परीक्षेपुर्वी दिनांक** 31 डिसेंबर, 2018 आणि **Practical UA/ Project Report CA / Industrial Training च्या गुणदान याद्या दिनांक** 20 फेब्रुवारी, 2019 **पर्यंत ऑनलाईन पध्दतीने पाठवाव्यात. दिनांक** 20 फेब्रुवारी, 2019 नंतर येणाऱ्या गुणदान याद्या स्विकारल्या जाणार नाहीत त्याची सर्व जबाबदारी अभ्यासकेंद्राची असेल याची कृपया नोंद घ्यावी.
7) **प्रात्यक्षिक परीक्षेचे सर्व परीक्षासाहित्य उदा. उत्तरपुस्तिका, ड्रॉईंग शीटस्, गुणदान याद्या आपल्या अभ्यासकेंद्रावरच जतन करून ठेवाव्यात. भविष्यात मुख्यालयातून निकालासंदर्भात गरज पडल्यास अभ्यासकेंद्राशी संपर्क साधण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

8) प्रात्यक्षिक परीक्षा विदयापीठ नियमानुसार सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती. कळावे.

**मानधन देयक अदा करण्याबाबत सूचना-**

1) मानधन दर तक्त्याप्रमाणे परीक्षा आयोजनामध्ये सहभागी व्यक्तीचे मानधनअदा करावे. (परीक्षा मानधन देयके विभागीय केंद्रांशी संपर्क साधून प्राप्त करून घेणे)
2) मानधन देयक अदा केलेल्या व्यक्तींची देयकावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.
3) संकीर्ण खर्च लेखी परीक्षेसाठी रू. 600/- व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी रू.300/- देय आहे. यापेक्षा अधिक खर्चास मान्यता मिळणार नाही.
4) परीक्षा मानधन देयके पूर्ण करून विभागीय केंद्राकडे जमा करण्यात यावीत.

**इतर सूचना-**

१)आपल्या परीक्षाकेंद्रावर गैरप्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी व तशी सूचना परीक्षा कालावधीत नोटीस बोर्डवर लावण्यात यावी, तसेच परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.
2) आसनव्यवस्थेसंदर्भात आवश्यक माहिती विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी बोर्डवर लिहिण्यात यावी.
3) परीक्षेसंदर्भात काही अडचणी असल्यास मुख्यालयाशी संपर्क साधावा. (फोन नं. 0253-2230013).
4) परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे याबाबत विद्यार्थ्यांना कळवावे. लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठ नियमानुसार सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.
**5) ऐनवेळी परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेचा Script No. विद्यार्थ्यांच्या हॉलतिकीटावर नमूद करणे आवश्यक आहे.**
**6) बहि:स्थ परीक्षकाने ऐनवेळी परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी बफर एन्ट्रीच्या नंबरसह अभ्यास केंद्रास व मुख्यालयास कळविणे आवश्यक आहे.**

कळावे.

13/12/18

**(टी.व्ही.कुलकर्णी)**
**सहायक कुलसचिव, परीक्षा कक्ष-3**

Practical आणि CA गुणांची Data Entry करण्यसाठी विद्यापीठाच्या पोर्टलवर (www.ycmou.digitaluniversity.ac) लॉगिन करावे. यानंतर खालील Steps प्रमाणे Mark Entry करून Mark Publish करावेत.

**Steps for Data Entry**

1. Login on – www.ycmou.digitaluniversity.ac
2. Click on - Examination Tab
3. Click on - Post Examination Tab
4. Click on - Assessment Data Entry Tab
5. Click on - Data Entry Tab

**Steps for Publish Entered Marks**

1. Click on - Examination Tab
2. Click on - Post Examination Tab
3. Click on - Assessment Data Entry Tab
4. Click on - Data Synchronization Tab
5. Click on - Submit data to University/ERPS Tab
6. Click on - Submit Student –Paper Assessment data to University/ERPS Tab

**(महत्वाचे : मार्क एंट्री करण्यापुर्वी विद्यापीठाच्या पोर्टवरील Presentation Tab मधील अं.क्र. 11 – How to do mark entry आणि 12 – How to Publish Paper Mark Entry हे Presentation बघावेत.) मार्क एंट्रीसाठी विभागीय केंद्राकडून मिळालेल्या अभ्यासकेंद्राच्या Login ID चा वापर करावा. मार्क एंट्रीसाठी लॉगिन तयार करण्यासासंदर्भातील Presentation अ.क्र. 20 -Online Registration (Create Login) for Examination Coordinators (for Mark entry) उपलब्ध आहे.)**

**(Presentation Link - http://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=26784)**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222
दूरध्वनी क्रमांक - (0253) 2231714, 2231715, 2230227, 2230013 टेलिफॅक्स (0253) 2230298

जा. क्र. : एचएक्स/परीक्षा कक्ष-३/2018/ 302 दिनांक-13 डिसेंबर, 2018

प्रति,
मा.केंद्रप्रमुख व केंद्रसंयोजक
य.च.म.मु.वि.अभ्यासकेंद्र

---

**अत्यंत महत्वाचे**

**विषय:-** 3 जानेवारी, 2019 च्या परीक्षेच्या **Internal(CA)& Practical(UA)** गुणांबाबत ...

**मा.महोदय,**

निरंतर शिक्षण विद्याशाखेच्या डिप्लोमा इन बेसिक फॅसिलिटी सर्व्हिसेस (V17), बी.एस्सी.इन बेसिक फॅसिलिटी सर्व्हिसेस (V19), हॉटेल मॅनेजमेंट (T74&V74,T76&V76,T77&V77,T78&V78,V90,V91,V101, V102), बी.एस्सी. इन एमजीए (T97), अभियांत्रिकी या शिक्षणक्रमांची परीक्षा व एम.एस्सी. शिक्षणक्रमाची सेमिस्टरची परीक्षा 3 **जाने.**2019 पासून आयोजित करण्यात आलेली आहे.
सदर शिक्षणक्रमाच्या **Internal(CA)** चे मार्क online दिनांक 31 डिसेबर 2018 पुर्वी पाठवणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या गुणदान याद्या स्विकारल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व हॉटेल मॅनेजमेंट शिक्षणक्रमांच्या **Practical (UA)** चे गुण **online** पध्दतीने दिनांक 20 फेब्रुवारी, 2019 पुर्वी पाठवावयाचे आहेत. तसेच अभियांत्रिकी शिक्षणक्रमाच्या प्रत्येक कोर्स ची प्रात्यक्षिक परीक्षा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी **Practical (UA)**चे गुण **online** पध्दतीने विद्यापीठाला पाठवणे आवश्यक आहे. त्याकरिता केंद्राला दिलेला **User ID &** पासवर्ड वापरून **login** करण्यात यावे. **Login** केल्यानंतर सोबत जोडलेल्या क्रमानुसार गुणांची नोंद करण्यात यावी.

वरील प्रमाणे online पध्दतीचा वापर करून **Internal (CA) & Practical (UA)** चे गुण भरून देण्यात यावे. सदर गुण अभ्यासकेंद्राच्या नोटीस बोर्डवर दर्शनी भागावर लावून विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. विद्यार्थ्यांची स्वाक्षरी झालेली प्रत दिनांक 20 फेब्रुवारी, 2019 पर्येंत विद्यापीठातील परीक्षा कक्ष -३ मध्ये पाठवावी याची संपूर्ण जबाबदारी अभ्यासकेंद्राची असेल. **Online** पध्दतीचा वापर न करता पाठवलेले गुण स्विकारले जाणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
**अधिक माहितीसाठी –**
**(Presentation Link - http://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=26784)**

13/12/18
**(टी.व्ही.कुलकर्णी)**
**सहायक कुलसचिव, परीक्षा कक्ष-3**